
'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार'
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

NAAC Accredited "A"
with CGPA- 3.24 in 3rd cycle
58th Rank in India Ranking 2017,
by NIRF (MHRD)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर



# विवेक NEWS

● प्रबंध संपादक
प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
● कार्यकारी संपादक
डॉ. दीपक तुपे
डॉ. प्रदीप पाटील
● सहाय्यक संपादक
अनुष्का सावंत, बी. एस्सी. २
प्राजक्ता पाटोळे, बी. ए. २
अलफिया खान, बी. ए. १
तेजस्विनी शिलोळे, बी. ए. २
काजल इंडिकर, बी. ए. २
पूजा कोलकार, बी. ए. २
नमिरा जमादार, बी. ए. १
अनिकेत पाटील, बी. ए. २

वर्ष : ६ | अंक : १२ | ऑगस्ट, २०१९ | पाने चार | पान नं. १ | स्वागत मूल्य : १ रुपया

## तीन एन. सी. सी. छात्रांना मुख्यमंत्री स्कॉलरशिप



कोल्हापूर दि.२८ : येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या खालील तीन एन. सी. सी. छात्रांना एन. सी. सी. कार्यालय, कोल्हापूर यांचे तर्फे सन २०१८ ची मुख्यमंत्री स्कॉलरशिप जाहीर झाली आहे. यामध्ये -

१) कॅडेट सुजाता पाटील, बी. ए. ३
२) कॅडेट अर्चना मोरे, बी. एस्सी. ३
३) कॅडेट प्रतिराज पाटील, बी. एस्सी. ३

यांचा समावेश आहे. या यशाबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते सत्कार करणेत आला. या सर्व छात्रांना कोल्हापूर एन सी. सी. ग्रुपचे ग्रुम कमांडर ब्रिगेडियर डोग्रा, कर्नल जे. पी. सायकीया, महाविद्यालयातील एन. सी. सी. अधिकारी कॅप्टन सुनीता भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी वरील छात्रांचे अभिनंदन केले आहे.

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०१ वी जयंती साजरी



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जयंतीनिमित्त बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस. सोबत संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे व इतर मान्यवर.

कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक विचारात मानवी समाजाचा उध्दार करण्याची भूमिका होती. त्यांच्या कृतीशील विचारात संत, महंत, विचारवंतांची सुसंगती होती. शिक्षणाचे पावित्र्य व सुसंस्काराची जडणघडण जपणाऱ्या त्यांच्या ज्ञानविचाराने श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेची उभारणी केली. डॉ. बापूजी साळुंखे हे शैक्षणिक कार्यातून सामाजिक बांधिलकी जोपासणारे महामानव होते, असे विचार मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०१ व्या जयंती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष मा प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभी केलेली ज्ञानसंस्था बहुजन समाजातील गोरगरीबांच्या मुलांना ज्ञान देणारी एक आदर्शवत संस्था आहे. विश्वात्मक बंधूभावाची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, यासाठी शिक्षक हा विद्यार्थीभिमुख व मूल्याधिष्ठित शिक्षण देणारा असला पाहिजे. बापूजींनी त्यांच्या शैक्षणिक विचारांची पालखी घेऊन जाणाऱ्या कृतीशील गुरुदेव कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली व ही शिक्षणव्यवस्था अबाधित ठेवली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. महेश हिरेमठ यांनी संस्थेची प्रार्थना व भक्तीगीते सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय व स्वागत संस्था सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. यावेळी डॉ. मच्छिंद्र नांगरे यांच्या 'डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच जिल्हा पोलीस प्रमुख अभिनव देशमुख यांच्या परिवाराने बापूजींची भव्य प्रतिमा संस्थेला भेट दिली. यावेळी मराठी साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य शिरीष चिटणीस, सौ. सबनीस तसेच संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील, प्राचार्य डॉ. अशोक करांडे, संस्थेचे उपाध्यक्ष मा. संपतराव जेधे, डॉ. शरदचंद्र साळुंखे, संस्थेचे आजी माजी पदाधिकारी, आजीव सेवक, संस्थेचे हितचिंतक तसेच विभागीय शाखा प्रमुख, सर्व शाखांचे प्राचार्य, गुरुदेव कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. एम. ए. पीरजादे यांनी केले.

## स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान महत्त्वाचे



आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करतानाश्री. फेलिक्स मखोरी असांदे,सोबत संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. मंजुश्री घोरपडे व इतर मान्यवर.

कोल्हापूर दि.०१: शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे स्वातंत्र्याच्या चळवळीमधील महात्मा गांधीजींचे अनुयायी होते. महात्मा गांधीजींच्या आचार आणि विचारांचा प्रभाव बापूजींच्यावर होता. त्यामुळेच ते सन १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यासारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात योगदान दिले. असे विचार केनियाचे इतिहास संशोधक श्री. फेलिक्स मखोरी असांदे यांनी व्यक्त केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील इतिहास व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान' (शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व समकालीन महाराष्ट्रातील स्वातंत्र्यसैनिकांच्या विशेष संदर्भाने ) या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षीय मनोगतात संस्था कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, ज्यांनी स्वतःच्या घरादाराचा व संसाराचा विचार न करता स्वातंत्र्याच्या अग्नीकुंडात वाहून घेतले, अशांपैकी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे एक क्रांतीकारक देशभक्त होते. या बापूजींनी भूमीगत राहून जेलमध्ये जाणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना मदत केली. बापूजींसारख्या अनेक क्रांतीकारकांच्या त्याग आणि बलिदानामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी आपल्या स्वागत व प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. पाहुण्यांचा परिचय प्रा. समीक्षा फराकटे यांनी करुन दिला. सुत्रसंचालन प्रा. राजश्री पाटील यांनी केले. आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी मानले. संयोजन इतिहास विभागाचे डॉ. एस. आर. कट्टीमनी तसेच राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार यांनी केले.

## सायबर सुरक्षा काळाची गरज



कार्यक्रमात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के सोबत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. कामत, डॉ. कट्टीमनी.

कोल्हापूर, दि. ३०: ई-मेल, फेसबुक, आरकुट, वॉटसॲप, ट्विटर, टेलीग्राम, डेटा बेस, ऑनलाइन बँकिंग, वेबसाइट, ब्लॉग, ऑनलाइन कार्यप्रणालीची सुरक्षा धोक्यात आली आहे. सायबर क्राइम व हैकिंगच्या माध्यमातून फसवणूकीचे अनेक गैरप्रकार पुढे येत आहेत. त्यामुळे सायबर व डेटाबेस सुरक्षितता काळाची गरज बनली आहे. त्यांच्या जनजागृतीसाठी असे फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम सारखे उपक्रम राबविणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. पंडित मदमोहन मालवीय रिसर्च सेंटर व शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने 'सायबर सिक्यूरिटी ॲन्ड डाटा सायन्सेस' या विषयावर बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, ऑनलाइन बैकिंगच्या माध्यमातून लाखों रुपयांचे व्यवहार करत असतो, परंतु यासाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षितता तो बाळगत नाही. त्यामुळे अनेक सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. यासाठी सायबर व डेटा बेसची सुरक्षितता महत्वाची आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

कोल्हापूर दि.२६ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज लोकनेते, लोकनायक व लोकांचे राजा होते. महाराजांनी आपल्या २८ वर्षांच्या काळात अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यामध्ये त्यांनी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले, विधवा पुर्नविवाहास मान्यता दिली. जातीभेद नष्ट करुन प्रस्थापितांचा विरोध मोडून काढला. वेगवेगळ्या समाजासाठी विविध वसतिगृहे सुरु केली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. कुस्तीला प्रोत्साहन दिले व कोल्हापूर बंधारे बांधले. त्यांनी आपल्या कृतीतून कोल्हापूरच्या विकासात भरीव योगदान दिले, असे विचार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. ते येथील विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) मध्ये आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती प्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## 'विवेक' नियतकालिक शिवाजी विद्यापीठात प्रथम



समारंभात प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांना पुरस्कार वितरण करताना डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर दि. ८ : सातत्यपूर्ण यशाची परंपरा याही वर्षी कायम राखत कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजच्या 'विवेक' नियतकालिकाने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेमध्ये बिगर व्यावसाईक गटामध्ये पाचव्यांदा प्रथम क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. यापूर्वी या महाविद्यालयाने या स्पर्धेत पाच वेळा प्रथम येण्याचा व एक वेळ व्दितीय येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. हा पुरस्कार सोहळा शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर व विवेक चे संपादक प्रा. बी. के. गोसावी यांना सन्मानपूर्वक शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेसाठी दिला जाणारा प्रथम क्रमांकाचा फिरता चषक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या भाषणातून नियतकालिक स्पर्धेविषयी माहिती देत शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कला व साहित्य लेखनाविषयी अभिरुची निर्माण करण्याच्या दृष्टीने अधिक दर्जेदार नियतकालिके निघाली पाहिजेत व या नियतकालिकांचे ऑनलाईन प्रसारण होऊन ते समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचले पाहिजे. वाचनसंस्कृती जगण्यासाठी असा प्रयोग करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले.

## विप्रो मध्ये विवेकानंदच्या आठ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेज व विप्रो कंपनी, पुणे यांचेमार्फत दि. २३.३.२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये कॅम्पस् इंटरव्हयूचे आयोजन करणेत आले होते. या करीता बी. एस्सी, बीसीएस, बी.सी.ए. च्या अंतिम वर्गात शिकणारे व किमान ६० टक्के गुण असणारे विद्यार्थी पात्र होते. कंपनीमार्फत त्यांना प्रथम विप्रो कंपनीची माहिती तसेच निवड झालेनंतर कशा पध्दतीचे काम करावयास लागणार आहे याची माहिती दिली. परीक्षा उत्तीर्ण झालेनंतर त्यांचे टेक्नीकल राऊंड घेणेत आले. त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे पर्सनल राऊंड घेणेत आले. अशा सर्व चाचणीनंतर अंतिम निवड झालेल्या ०८ विद्यार्थ्यांना नियुक्ति पत्रे देण्यात आली. कंपनीच्या वतीने त्यांना प्रशिक्षण देणेत येणार आहे.

सदर प्लेसमेंटचे आयोजन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. एम. एम. कारंजकर, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डॉ. टी. सी. गौपाले व प्रा. सनी काळे यांनी केले होते.

# तापमान वृध्दी : मानवतेचा ऱ्हास

हिमनग वितळताहेत, समुद्राची पातळी वाढतेय जंगल नष्ट होताहेत आणि वनसंपत्ती मेटाकूटीला येऊन टिकण्याचा प्रयत्न करतेय. या सर्वातून हे चित्र स्पष्ट झालयं की मानवाने आपल्या आधुनिक जीवनशैलीला सजवण्यासाठी गेल्या काही शतकांमध्ये निसर्गाच्या आणि परिणामी स्वत:च्याच ऱ्हासाकडे वाटचाल चालू केली आहे. गेल्या आठ दहा वर्षांमध्ये भरभर झालेली ग्रीनहाऊस वायूंची वाढ आपण हल्ली रोजच पाहत आहोत. या सर्वाला आपण इंग्रजीत ग्लोबल वार्मिंग तर मराठीत जागतिक तापमानवाढ असं गोंडस नाव दिलं आहे. पण या तापमान वाढीमुळे पृथ्वीच्या हवामानामध्ये तसेच वातारवणीय पट्टयांमध्ये झालेला बदल जो की ठिकाणा दर ठिकाणाला वेगवेगळा भासतो. याचं एक बोलकं चित्र आपल्यासमोर दिसतं आहे.

आता एक नजर या सर्व परिस्थितीला कारणीभूत ठरलेल्या मानवांच्या कृतीवर टाकून पाहूया. प्राचीन काळामध्ये मनुष्य वस्ती कमी असे. त्यामुळे गरजा देखील मर्यादित होत्या. पण कालांतराने मनुष्य वस्ती वाढू लागली तशी माणसांच्या गरजांनी देखील त्यांच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकायला सुरवात केली. या सर्वामध्ये नवीन तंत्रज्ञानाने आणि नवनवीन शोधांनी एक महत्त्वाची भूमिका बजावली. जगात औद्योगिक नांदी घातली गेली व सर्वांनाच विकास हवाहवासा वाटू लागला. मनुष्याच्या सर्वच क्षेत्रातील गरजा विस्तारत गेल्या व त्यांची जागा हाव ने घेतली. मोठमोठ्या टोलेजंग इमारती, हायवेज, रोडवेज, यांसाठी लाखो वनस्पती नष्ट करण्यात आली. आपली भूक भागवण्यासाठी मनुष्याने प्राण्यांच्या कत्तली सुरू केल्या, मनोरंजन म्हणून शिकारीच्या छंदापायी अन्नसाखळीवरच थेट घाला घातला गेला. निवारा आणि अन्नसाठा नष्ट झाल्याने कितीतरी प्राण्यांच्या जाती दुर्मिळ व दुर्मिळ जाती नष्ट झाल्या हे कमी म्हणून की काय मानवाने प्रदुषणरूपी राक्षसाद्वारे पृथ्वीच्या ऱ्हासात आणखी भर घातली.

हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जल प्रदूषण या सर्वच गोष्टींनी पृथ्वीचे आणि पर्यायाने माणसाचं जीवन कलुषित केलं. दैनंदिन आयुष्यात विकासाचे द्योतक ठरलेल्या दुचाकी, चारचाकी वाहनांनी जागतिक तापमान वाढीत तितकाच हिस्सा उचलला आहे. जितका कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या धुराने. पण या सर्व समस्येमध्ये मानवाने आपल्या विकासाची धूरा थांबवण्याचा निर्धार मात्र कधी केला नाही. आता हेच बघा ना, पॅरिसच्या करारातून अमेरिकेने घेतलेली माघार असो किंवा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ नाकारणे असो, या व अशा अनेक उदाहरणांनी आपल्याला पर्यावरणाविषयीची अनास्था व जागृकतेचा अभाव यांची प्रकर्षाने जाणीव करून दिली आहे. सद्यस्थितीमध्ये देखील परिस्थिती बिकट व ऱ्हासाकडे अधिकच झुकताना दिसत आहे.

भारताच्याच बाबतीत बोलायच झालं तर गेल्या काही वर्षांमध्ये भारतामध्ये उद्‌भवलेली पूरस्थिती हे अत्यंत जीवंत उदाहरण म्हणून पाहिलं जाऊ शकतं. भारतातील अलिकडच्या काळात म्हणजेच २०१३ चा उत्तराखंड महाप्रलय. दोन वर्षापूर्वीचा केरळचा महापूर. तर याच वर्षी महाराष्ट्रावर व कर्नाटकावर आलेलं जलसंकट या पूरजन्य घटनांनी अख्या जगाला हादरवून टाकलं आहे. इतकचं कशाला तर याच वर्षी ब्राझीलच्या जगातील सर्वात विशाल अशा ॲमेझॉन जंगलामध्ये पेटलेली व अजूनही तेथील सजीवसृष्टीचा संहार करणारी आग हे अगदीच ज्वलंत उदाहरण आहे. ॲमेझॉनची वर्षावने पृथ्वीची फुप्फुसे म्हणून ओळखली जातात. जवळजवळ पृथ्वीच्या एकूण ऑक्सिजन उत्पादनांपैकी २८ टक्के ऑक्सिजन एकट्या अमेझॉन वनांमधूनच पुरवठा केला जातो. त्यामुळे तेथे लागलेली आग ही एका मोठ्या व भयानक चिंतेची बाब ठरली आहे. ही आग रोखण्यासाठी जी-७ देशांनी देऊ केलेली आर्थिक मदत मात्र ब्राझिलच्या सरकारने नाकारणे हे अनाकलनीय आहे.

हरितगृह वायुंमूळे ओझोनला पडलेले भगदाड आणि त्याद्वारे पृथ्वीवर होत असलेली तापमानवाढ यांनी हिमनग वितळत आहेत. काही दिवसांपूर्वीच ग्लेशियरांच्या वितळण्याबद्दल एका बातमीने वर्तमानपत्रांचा एक कोपरा व्यापलेला मला आढळला. पण या गोष्टी कोपऱ्यावर नाही तर फ्रंट पेजवर चर्चा करण्याच्या गोष्टी आहेत. यांवर जितकी अधिक चर्चा तितके उपाय शोधण्याचे मार्ग अधिक. आज जगभर या विषयावर होत असलेल्या चळवळी, जनआक्रोश आणि पर्यावरणप्रेमींचे चिंतन पाहून अजूनही आशावादाला जागा आहे. परंतू प्रश्न असा उरतो की फक्त चर्चा किंवा प्रदर्शने करून प्रश्न सुटणार आहे का? जागतिक तापमानवाढीसारखा सर्वसमावेश व जटील प्रश्न सुटण्यासाठी मनुष्याला साथ हवी ती सदसद्विवेकबुद्धीची व सुनियोजित अंमलबजावणीची. हे संकट प्रत्येकाने वैयक्तिकरित्या समजून घेऊन त्यादृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. स्वसहभागाने खऱ्या अर्थाने हे चित्र पालटू शकते. पण असा सहभाग कळकळीचा व अविरत असणे गरजेचे आहे. अन्यथा तो दिवस दूर नाही जेव्हा मानवाला पृथ्वीवरला आपला लवाजमा घेऊन इतर ग्रहांवर पलायन करावे लागेल!

**कु. प्राजक्ता पाटोळे** - बी. ए. भाग दोन

# महापुराचं पाणी अन् उध्दवस्त संसार

कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यात पावसाचं रौद्ररूप पाहायला मिळालं. कोल्हापूर येथे पंचगंगा नदीचा विस्तार वाढून कोल्हापूर शहर व गावांमध्ये नदीचे पाणी शिरलं. घरांची पडझड झाली. घरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. अशा अनेक घटना कोल्हापूर जिल्ह्यात घडल्याच्या दिसत आहेत. यात माणसांचे, मुक्या जनावरांचे अतोनात हाल झाले. अन्न-धान्य, भाजीपाला, दूध, इंधन ह्या सगळ्याच्या कमतरतेमुळे प्रत्येकजण हवालदिल झाला. पंचगंगा नदीने धारण केलेलं हे रौद्ररूप पाहून पूर्ण कोल्हापूर जिल्हा हळहळला.



या महापुरामध्ये खूप लोक आपल्या घरांमध्ये व इतर ठिकाणी अडकून पडलेले होते. विना अन्न, विना वीज हे लोक पुरस्थितीच्या पाण्यात सलग ३-४ दिवस अडकून होते. माणूस परिस्थितीसमोर आणि निसर्गासमोर हतबल होऊन बसला होता. महापुराचा धोका जाणवताना स्थानिक लोक, एनडीआरएफ जवान, भारतीय सैन्यदल व सामाजिक संस्थानी बचावकार्य सुरू केलं. ह्या जवांनानी आपला जीव धोक्यात घालून लोकांना सुरक्षित ठिकाणी आणून सोडले. लोकांचे संसार उघडे पडले. पूरग्रस्तांचे प्रचंड हाल झाले. बिकट परिस्थितीत ह्या जवानांनी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू ठेवलं. सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करताना अनेक अडचणी आल्या. या सैनिकांनी न थकता, न थांबता बचावकार्य सुरू ठेवून वीसहजारपेक्षा जास्त लोकांना स्थलांतरित करून माणुसकी जिवतं आहे याचा प्रत्यय कोल्हापूरसह पूर्ण महाराष्ट्राला आणून दिला.

पूर ओसरला आहे. आता सगळी परिस्थिती स्थिरस्थावर होऊ लागली आहे. घरी परतल्यानंतर आपल्या घराची दुर्दशा पाहून लोकांचे डोळे पाणावले. घरातल सामान अस्ताव्यस्थ होऊन पडलं. संसार उघड्यावर पडलेत. काही घरांच्या भिंती कोसळल्या, मुलांच शाळेचं सामान भिजलं. गॅस, चूल होतं नव्हतं ते सारकाही वाहून गेलं. घरात आता फक्त राहिल्यात जुन्या आठवणी, खराब पाण्यामुळे पसरलेली दुर्गंधी. पूर ओसरल्यानंतर त्या जागेत मोठ्या प्रमाणात रोगराई पसरणार हे नक्की. पण शासनाने ह्याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर औषध फवारणी करून पुरग्रस्तांना सढळ हाताने मदत केली पाहिजे. सरकारचा उपयोग आतातरी लोकांना व्हायला हवा असे मला वाटते.

पंचगंगा नदीच्या या भयावह रूपाचं आणखी एक कारण नदीकिनारी इमारतींच बांधकाम झालंय हे दिसून येतं. नाल्यांच पाणी, त्यातील घाण, गाळ कचरा सारे नदीला येऊन मिळतंय. पंचगंगा प्रदुषित होत आहे हे कोणीच ओळखत नाही. आकस्मित आलेल्या पावसानं नदीनं रौद्ररूप धारण केलं ही बाब जरी खरी असली तरी माणसांकडून घडलेल्या चुकांची देखील कारणं शोधणं गरजेच आहे. नदीचा गाळ काढण्यापेक्षा नदीत गाळ टाकण्याचंच काम आपण अधिक जोमात करत आहोत. मध्यंतरी विवेकानंद कॉलेजने पंचगंगा शुद्धीकरणाची मोहिम हाती घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या दोन विद्यार्थ्यांना नदीवरील केरकचरा, घाण काढण्यासाठी दरदिवशी पाचारण केलं होतं. गणेश विसर्जनाचं निर्माल्याच कामही हाती घेऊन ही पंचगंगा वाचवण्याचं कार्य करीत असतात. शाळा, महाविद्यालये व सामाजिक संस्थाही असे काम करत असतात. नदीमध्ये खूप गाळ साठल्यामुळेचं पंचगंगा आईने हे रौद्ररूप धारण केले असावं. त्यात भरीसभर म्हणून कारखान्यामधून सोडली जाणारी मळी पाणी दूषित करते. आम्हाला मान्य आहे की शासनाने कारखान्यातील मळी नदीत सोडली जाऊ नये म्हणून काही कायदे तयार केलेत पण ह्या कायद्याचं कठोर पालन होत आहे का? की अजून ही काही बेजबाबदार सरकारी कर्मचाऱ्यांमुळे हे काम सुरू आहे ह्याची चौकशी कोणी केलीय का? ह्याशिवाय नदीकिनारी अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम ह्याआधीही झालेली आहेत. होत आहेत त्याचं काय?

पंचगंगा नदीचे पाणी दुषित झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर पाणी दुषित झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शिरोळ तालुक्यात प्रतिवर्षी शेतकरी व ग्रामस्थ आंदोलन करून नदीप्रदुषणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधतायत. आज प्रदुषण करणाऱ्या घटकांवर प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कठोर कारवाई होत नाही. यामुळे दरवर्षी शेतकरी तसेच ग्रामस्थांना दुषित पाण्याचा सामना करावा लागतो. दुषित पाण्यामुळे काविळीची लागणं होऊन यापूर्वी इचलकरंजी शहराबाहेर शिरोळ तालुक्यातील अनेकांचे बळी गेले आहेत. पंचगंगा नदीचे पाणी दुषित झाल्याने शिरढोण परिसरातील ग्रामस्थांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाशी संपर्क साधून नदीच्या प्रदुषणाकडे लक्ष वेधून घेतले होते. यानंतर प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करून दुषित पाण्याचे नमुने घेतले. नदी प्रदुषित करणाऱ्या घटकांवर कारवाई करण्याची ग्वाही त्यावेळी देण्यात आली. नंतर पुन्हा काळसर हिरवट रंगाचे रसायनमिश्रीत पाणी आले. या दुषित पाण्यामुळे नदीपात्रातील मासे, कासव तसेच अन्य जलचर प्राणी मृत्युमुखी पडले. तेरवाड बंधाऱ्यास बरके (बांध) घालून पाणी अडविण्यात आले. पण त्यामुळे मृत माशांचा खच तिथे साठला होता. पंचगंगा नदीच्या प्रदुषणप्रश्नी गेली अनेक वर्षे सातत्याने आंदोलन केले जात आहे. आंदोलनानंतर प्रदुषण करणाऱ्या घटकांवर ठोस कारवाई होत नसल्याने व प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दुटप्पी भुमिकेमुळे ग्रामस्थातून तीव्र संताप व्यक्त होतो आहे.

माणसाला शहर व गाव वाचवायची असतील तर नद्यांनाही वाचवलं पाहिजे. त्यांनाही सुखाने जगू दिल पाहिजे. नदीवर वृक्षारोपण करून नदीची झीज थांबवली पाहिजे. नदी आईसारखी असते, ती लेकरावर माया करते, जीव लावते. म्हणूनच लेकरं मोठी होतात. चला! या आईला वाचवूया आणि नद्यांनाही सुरक्षित ठेवूया. शासनाने आणि माणसांनी हे काम सामाजिक सुरक्षितता म्हणून केल पाहिजे असं मला वाटतं.

**यश रूकडीकर** बी. ए. भाग २

# सामाजिकता समाज माध्यमांची

संवाद संपर्क क्रांती घडवून आणणाऱ्या मीडियाने आज जगभरातील बहुतांश नागरिकांचे जिवन व्यापून टाकले आहे. भारतासारख्या देशामध्ये तर या नव समाज माध्यामांचा वापर आणि पगडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आज फेसबुक, व्हॉट्स ॲप, इंन्स्टाग्राम, गुगल प्लस, आरकुट, हँगआउट, ट्विटर इत्यादी नव समाज माध्यमांनी संवाद संपर्कक्रांती घडवून आणली. सोशल मीडिया म्हणजे नवसमाज माध्यमे जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. सोशल मीडियामुळे आपले नाती-गोती संपत चालली आहेत. यामुळे सामाजिक सलोखा बिघडत चालला आहे, हिंसक प्रवृती वाढत आहे. वैयक्तिक स्वार्थ जपण्याचा प्रयत्नही या माध्यमातून होताना दिसतो आहे. मनुष्य आपले



विचार मांडण्यासाठी फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर या माध्यमाचा वापर अधिक करतो. नुकतेच सर्वेक्षण असे आढळून आले की ३० वर्षाहून कमी वयाचे विदयार्थी सोशल मिडियात सतत काहीतरी अपडेट देत असतात. आजच्या तरूणांनाा जणू हे व्यसनच जडले आहे. सोशल मीडियावर अपडेट पोस्टला लाईक, शेअर, कमैंट मिळाले नाही तर नियमित वापर करणाऱ्या व्यंक्तीमध्ये चिंता, एकटेपणा आणि आत्मविश्वासाची कमतरता जाणवत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण ऑनलाईन समूहात आपल्या आयुष्याचे एक चित्र रंगवत असतो. परिणामी आपल्या फोटोला किंवा पोस्टला कमी लाईक आणि शेअर्स मिळाले नाही तर आपल्यामध्ये काहितरी कमतरता आहे असे वाटते आणि व्यक्ती व्यसनी बनतो. मात्र हल्लीच्या काळात ट्विटरसारख्या माध्यमाचा वापर हा एकमेकांच्या छेडछाड काढण्यासाठी केला जातो. तसेच त्यावरून महिलांना लक्ष्य केंद्रीत केले जाते. या सवयी किशोरवयीन मुला-मुलींना लागलेली दिसून येत आहे. इटरनेट आणि दूरसंचार या माध्यमांच्या मदतीने एकमेकांशी आभासी माध्यमातून जोडल्या गेलेल्या लाखो लोकांच्या गर्दीला सकारात्मक दिशाही देता येते आणि नकारात्मक दिशाही देता येते. जगभरातील विखुरलेल्या लोकांना जवळ आणणे इत्यादी उद्देश समोर ठेवून करण्यात आला, परंतु सामाजिक जीवनातल्या कुविचारांमुळे सोशल मिडियाचा वापर विध्वंसासाठी होताना दिसून येतो. ह्याला कुठेतरी थांबवण्याची वेळ आली आहे. सोशल मीडियाचा वापर करणारी तरूणाई यात निश्चितच बदल करू शकते. त्याची सुरूवात स्वतःपासून करा, जग आपोआप बदलेल. त्यामुळे समाज माध्यमांच्या सामाजिकतेवर प्रश्नचिह्न निर्माण होणार नाही.

**बिरू बावधणे**, बी. ए. भाग २

# समाजमाध्यमे आणि स्त्रीप्रतिमा

कला, क्रीडा, शिक्षण, व्यवसाय, चित्रपट, विज्ञान, तंत्रज्ञान, शिल्पकला, मूर्तिकला, राजकारण, समाजकारण या सर्वच क्षेत्रांत स्त्रीयांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. तसेच आपल्या उज्ज्वल स्त्री प्रतिमांचा ठसा उमटविला आहे. या स्त्री प्रतिमा समाजमनावर आपलं नाव कोरताना दिसून येतात.

## नवसृजनशील लेखनात उत्कृष्ट



**प्रेरणा पाटील**
बी. ए. भाग-३

स्त्रीचं रूप प्रत्येक क्षेत्रात सकारात्मक आहे. जसं की डिजीटल सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, वैचारिक आणि व्यावसायिक अशा अनेक विषयांवर स्त्रीया प्रभुत्त्व सिध्द करीत आहेत. वृत्तपत्र व मासिकातून नवसृजनशील लेखन करीत आहेत. स्पर्धेच्या युगात आपलं अस्तित्व सिध्द करीत आहेत.

## पुरूषांशिवाय स्वतंत्र अस्तित्व



**ऋतुजा पाटील**
बी. ए. भाग-३

स्त्रीया आपल्या कौशल्याच्या जोरावर अभिजात गुणांमुळे व्यवसायाभिमुख झालेल्या पहावयास मिळतात. आपल्या व्यवसायांची समाज माध्यमातून जाहिरात करतात. यु-ट्युब, वेबसाईट, ब्लॉग यासारख्या डिजीटल माध्यमातून आपले विचार जगासमोर मांडून पुरूषांशिवाय आपले स्वतंत्र अस्तित्व स्त्री निर्माण करीत आहे.

## अभिनय कौशल्यात निपुण



**कोमल हांडे**
बी.ए. भाग-३

बदलत्या काळात स्त्रीयांच्या सकारात्मक भूमिका प्रकाशझोतात येत आहेत. स्त्री व्यक्तिरेखा नव्या जोमाने चित्रपटात रेखाटलेल्या पहावयास मिळतात. त्यांचं अभिनय कौशल्य निपुण तर आहेच पण त्या तितक्याच उत्तुंग धाडसाने प्रतिनिधीत्व सुध्दा करतात.हे धाडस आणि अभिनय कौशल्य विविध चित्रपट व मालिकांमधुन येत आहे.

## नव्या पिढीला मार्गदर्शक



**अर्चित कदम**
बी. ए. भाग-२

ज्ञान, परंपराची बहुविविधता, जगण्यामध्ये लवचिकता, परिवर्तनशिलता, गतिशिलता, निती नियमांचं पालन करणाऱ्या स्त्रिया, साहित्यामध्ये उठावदारपणे मांडलेल्या दिसतात. ज्ञानाधिष्ठित स्त्री-प्रतिमा या निश्चितच वाचकांना आणि नव्या पिढीला मार्गदर्शक ठरतात. पाश्चिमात्य साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखा या तितक्याच प्रभावशाली आहेत.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्य जोपासते



**सायली वाळके**
बी.बी.ए. भाग-३

आजची स्त्री साधी, सरळ, सौजन्यपूर्ण आहे. नाजूकपणा न दाखविता जीवनातील सर्व समस्यांना ताकदीने व दृढतेने सामोरे जाते. जाहिरातीमधून सुध्दा स्त्रीशक्तीचे प्रतिनिधीत्व दिसून येते. आजची स्त्री मोकळेपणाने, निर्भयपणे आपले विचार मांडत अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखत आहे.

## स्वातंत्र्याचं मोल जपणारी स्त्री



**चैतन्य पाटील**
बी. ए. भाग-३

परिवर्तनाच्या वाटेवर लावलेल्या निर्जीव परंपरेच्या पिंजऱ्यामधील आमिषांना बळी न पडणाऱ्या विचारशील स्त्रीया वाङ्मयामध्ये दिसून येतात. जगण्याचा लढा सर्व क्षेत्रात तीव्र होत असताना त्या कोठेही डगमगताना दिसत नाहीत. जणू त्या तेजस्विता आणि तपस्विताच आहेत. वाङ्मयीन जगतात अत्यंत सजगतेने वावरणाऱ्या आहेत.

## परंपरेच्या जोखडातून वेगळं अस्तित्व



**स्वाती पवार**
बी. ए. भाग-२

सिनेमातील स्त्री रेखांच्या छटाही बदलताना दिसतात. आजकाल स्त्री सिनेमे बॉक्स ऑफिसवर हिट होताना दिसतात. स्वत:चं वेगळं अस्तित्व शोधणारी सृजनशील स्त्री परंपरेच्या जोखडातून बाहेर पडलेली दिसते. अन्यायाविरुध्द आवाज उठवणाऱ्या नायिका, कुटुंब आणि समाज यांच्याप्रती सजग दिसतात.

## शिल्पकलेतील स्त्री प्रतिमा



**ऋतुजा अडसुळ**
बी. ए. भाग-३

भारतीय शिल्पकला व मूर्तिकलेला खूपच प्राचीन इतिहास प्राप्त झाला आहे. या शिल्पातून अनेक देव-देवतांचे, त्यांच्या शस्त्रांस्त्रांचे, आभूषणांचे रेखाटन पहावयास मिळते. पण यातून सर्वात जास्त प्रतिमा स्त्रीयांच्याच दिसून येतात. या शिल्पकलेमधून रेखीव बांधा व मृगनयनी डोळे असे सौंदर्य असणाऱ्या भारतीय स्त्रीचे दर्शन घडते.

## विचार विश्वाचे प्रतीक स्त्री



**भगवान मानवर**
बी. ए. भाग-३

स्त्री शिल्पे फक्त सौंदर्याचे प्रतिक म्हणून नव्हे तर सौंदर्याबरोबरच शक्ती, बुध्दी, साहस, संपत्ती, सुख अशा भाव भावनांचे व विचार विश्वाचे प्रतीक म्हणून कोरल्या जातात. हडप्पा व मोहोंजोदोडो येथे उत्खननात सापडलेल्या बहुतेक मूर्त्या या स्त्रीच्याच आहेत. विविध ठिकाणच्या लेण्यांमध्ये स्त्री प्रतिमा रेखाटलेल्या दिसतात.

* मार्गदर्शक : मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, * प्रकाशक व प्रबंध संपादक : प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, * कार्यकारी संपादक : डॉ. दीपक तुपे, डॉ. प्रदीप पाटील.
* सहाय्यक संपादक : अनुष्का सावंत, बी. एस्सी. २, प्राजक्ता पाटोळे, बी. ए. २, अलफिया खान, बी. ए. १, तेजस्विनी शितोळे बी. ए. २, काजल इंडिकर बी. ए. २, पूजा कोलकार बी. ए. २ , नमिरा जमादार, बी. ए. १, अनिकेत पाटील, बी. ए. २
* प्रतीक प्रिंटिंग सर्व्हिसेस कोल्हापूर येथे छापून विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून प्रसिध्द केले. फोन : (०२३१) २५४३४०२. * या अंकात छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (फक्त खासगी वितरणासाठी)

विवेकNEWS

ऑगस्ट २०१९

# अविस्मरणीय

## छायाचित्रेच परिस्थिती बदलू शकतात



'फोटोग्राफी ऑन व्हील्स'कार्यशाळेत बोलताना पद्मश्री सुधारक ओलवे

कोल्हापूर दि.१४ : माझ्या दृष्टीकोनातून कॅमेरा हे एक माध्यम असून तळागाळातील लोकांच्या तसेच आयुष्याशी, परिस्थितीशी झगडणाऱ्या उपेक्षितांचे फोटो सध्याची परिस्थिती बदलू शकतात. मला हे लोक माझे वाटतात. हेच माझे सेलिब्रेटी आहेत. असे उद्गार सुप्रसिध्द फोटो जर्नालिस्ट, पद्मश्रीकार मा. सुधारक ओलवे यांनी 'फोटोग्राफी ऑन व्हील्स' या विषयावर विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे बी. व्होक., फोटोग्राफी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये काढले.

यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी उपेक्षितांचे छायाचित्रकार असा गौरव पद्मश्री सुधारक ओलवे यांचा केला. तसेच महाविद्यालयाने केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला.

विद्यार्थ्यांनी आपापल्या गावामध्ये जाऊन फोटोग्राफीव्दारे लोकांची स्टोरी तयार करा व सामान्य वाटणारे विषय घेऊन मोठे व्हा. असा सल्ला दिला. या कार्यशाळेमध्ये इंडस्ट्रियल फोटोग्राफी करणारे श्री. निलेश गावडे त्याचप्रमाणे कोल्हापूरच्या कैद्यांवर काम करणारे श्री. अभिजीत गुरव यांनीही सहभाग घेतला. या प्रसंगी मा. सुधारक ओलवे यांचे समाजात कोणतीही प्रतिष्ठा नसलेले पण समाजासाठी काम करणाऱ्या उपेक्षितांच्या फोटोंचे प्रदर्शन सर्वांना पाहण्यासाठी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करण्यात आले. या कार्यशाळेस मा. निखील चौधरी, चित्रकार मा. सुरेंद्र राव तसेच कोल्हापूरातील नामवंत हौशी फोटोग्राफर, विद्यार्थी, पत्रकार बहुसंख्येने हजर होते.

# आंतरराष्ट्रीय विद्यार्थी घडविणे काळाची गरज

कोल्हापूर दि.१८ : आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ येत चालले आहे. पण माणसांमधील टॅलेंट व माणूसपण हरवत चालले आहे. महात्मा गांधीजींनी देशाला स्वातंत्र मिळवून दिले, पण शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राला सुसंस्कारी माणूसपण दिले. लाखों विद्यार्थ्यांच्या जीवनाला अमरत्व प्राप्त करण्याचे काम बापूजींनी केले. विद्यार्थ्यांमधील दैवी गुण जागा करून त्यांना ज्ञान, विज्ञानाबरोबरच सुसंस्कार दिले व विद्यार्थ्यांमधील माणूसपण जागे केले. असे विचार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मांडले. ते विवेकानंद कॉलेजच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध, वर्क्तत्व चित्रकला, टॅलेंट स्पर्धा २०१८-१९ कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी बोलत होते.



राज्यस्तरीय टॅलेंट स्पर्धेच्या समारोप प्रसंगी बोलताना कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे

राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेच्या प्राथमिक गटात गडहिंग्लज हायस्कूल ज्युनिअर कॉलेज, गडहिंग्लजची कु. साक्षी कांबळे हीचा प्रथम क्रमांक आला. तर माध्यमिक गटात शि. म. डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूल, इचलकरंजीचा जयकुमार कडाळे याचा प्रथम क्रमांक आला. उच्च माध्यमिक गटात स्वामी रामानंद भारती ज्युनियर कॉलेज, तासगावच्या अंकुश शिंदे याचा प्रथम क्रमांक आला. महाविद्यालयीन गटात समाजभूषण गणपतराव काळभोर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोणी-काळभोरचा सम्राट हरेल याचा प्रथम क्रमांक आला. तर गुरुदेव कार्यकर्ता गटात श्री भवानी विद्या मंदिर, सातान्याचे श्री कल्लाप्पा कांबळे यांचा प्रथम क्रमांक आला.

राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या प्राथमिक गटात वसंतराव पाटील विद्यामंदिर, मांजर्डेची कु. समीक्षा घोटकर हीचा प्रथम क्रमांक आला. तर माध्यमिक गटात श्री रामकृष्ण विद्यामंदिर, नागठाणेचा अंकिता महाडिक याचा प्रथम क्रमांक आला. उच्च माध्यमिक गटात पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज लोणी काळभोरचा प्रथमेश गायकवाड याचा प्रथम क्रमांक आला. महाविद्यालयीन गटात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरचा श्री. अभिषेक केसरकर याचा प्रथम क्रमांक आला. तर गुरुदेव कार्यकर्ता गटात पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज लोणी काळभोरचे श्री. फैयाज मुलाणी यांचा प्रथम क्रमांक आला.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या प्राथमिक गटात न्यू इंग्लिश स्कूल, रेंदाळची कु. श्रेया भाकरे हिचा प्रथम क्रमांक आला. तर माध्यमिक गटात सिध्दनाथ हायस्कूल, आरवडेची कु. वैष्णवी पाटील हीचा प्रथम क्रमांक आला. उच्च माध्यमिक गटात पृथ्वीराज कपूर मेमो. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज लोणी काळभोरची कु. वैभवी काळभोर हीचा प्रथम क्रमांक आला. महाविद्यालयीन गटात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरचा सौरभ पाटील याचा प्रथम क्रमांक आला. तर गुरुदेव कार्यकर्ता गटात न्यू इंग्लिश, मालेचे श्री. व्ही. जे. माने यांचा प्रथम क्रमांक आला.

राज्यस्तरीय टॅलेंट स्पर्धेच्या प्राथमिक गटात तुकाराम सावळा कदम विद्यालय, मसुचीवाडीची कु. काजल कदम हीचा प्रथम क्रमांक आला. तर माध्यमिक गटात सिध्दनाथ हायस्कूल, आरवडेचा उतरेश्वर हायस्कूल, केमचा अविनाश साळुंखे याचा प्रथम क्रमांक आला.

# प्रशासकीय कर्मचारी कार्यशाळा संपन्न



कार्यशाळेचे उद्घाटन करताना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे

कोल्हापूर दि. २०. महाविद्यालयाच्या विकासात शिक्षकाच्या अध्यापना इतकेच प्रशासनाचे कामकाज देखील महत्त्वाचे असते. प्राचार्यांचा संबंध प्रशासकीय कर्मचाऱ्यांशी अधिक जवळचा असतो. कामाच्या अनेक अडचणीवर महत्त्वाचे निर्णय घेण्याची संधी या प्रशासकीय कामकाजामुळे प्राप्त होते. कामामुळे प्रशासनातील काही व्यक्तींचा चेहरा व त्यांचे काम ओळखीचे होते. शैक्षणिक विकासाची अनेक कामे या प्रशासनातूनच पुढे जात असतात. म्हणून महाविद्यालयाच्या विकासात प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे विचार शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी 'महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीमध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले ज्याप्रमाणे कुटूंबात कौटुंबिक जिव्हाळा, आपलेपणा, प्रसन्ता, शुध्द भावना व प्रामाणिकपणा नांदत असतो त्याप्रमाणे प्रत्येक कार्यालयात तो नांदला पाहिजे. दैवी गुणाच्या जोपासनेतून आंतरिक शुध्दता व चारित्र्यता जोपासता आली पाहिजे. खुर्चीचा मान राखताना दुसऱ्याचा आदर करता आला पाहिजे. असे विचार त्यांनी मांडले. प्रास्ताविक व स्वागत करुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले की, महाविद्यालयाचे दैनंदिन कामकाज यशस्वीपणे करण्यासाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. दुसऱ्या सत्रात मा. अरुण सकटे, प्रबंधक, शिवाजी कॉलेज यांनी मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात प्राचार्य एम. ए. शेख, माजी प्राचार्य रयत शिक्षण संस्था यांनी 'स्कील डेव्हलपमेंट' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच कार्यालयातील वर्तन, वेशभूषा , शिस्त व वरिष्ठांचा आदर कसा ठेवावा याबाबत त्यांनी स्लाईड शो व्दारे मार्गदर्शन केले.

# उच्च शिक्षणातून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी

कोल्हापूर, दि.१५: नॅकच्या नवीन सात क्रायटेरियातून विद्यार्थ्यांचा विकास, शिक्षकांची गुणवत्ता, प्रशासनाची भूमिका आणि सामाजिक बांधिलकी या चार बाबी महत्त्वाच्या आहेत. उच्च शिक्षणाच्या प्रत्येक शाखेच्या अभ्यासक्रमात अशा बाबींचा समावेश झाला पाहिजे की ज्यातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास, नोकरीच्या संधी प्राप्त होतील. त्यामध्ये शिक्षक व प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे. उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली पाहिजे, असे विचार शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

ते विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (IQAC) वतीने नॅक बेंगळूर यांच्या साहाय्याने 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता विकास' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या सचिवा मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे म्हणाल्या की, नॅकच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रत्येक संस्थेला आपला दर्जा राखता आला पाहिजे. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी असला पाहिजे. विद्यार्थ्यांची मानसिकता व आवश्यकता डोळयांसमोर ठेवून अभ्यासक्रम बनविला पाहिजे. हा अभ्यासक्रम केवळ सैध्दांतिक असून चालत नाही तर तो प्रायोगिक असला पाहिजे, की ज्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळेल. त्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.



नॅकची सुधारीत प्रणाली या राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना डॉ. पी. एस. पाटील. सोबत संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर.

प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक व चर्चासत्राच्या संयोजिका डॉ. श्रुती जोशी यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सुत्रसंचालन प्रा. राजश्री पाटील यांनी केले. आभार डॉ. कैलास पाटील यांनी मानले. चर्चासत्राच्या संयोजनासाठी प्रा. सनी काळे, प्रा. समीक्षा फराकटे व नॅक कमिटी सदस्यांचे सहकार्य लाभले.

चर्चासत्रातील दुसऱ्या सत्रामध्ये फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथील डॉ. समिर तेरदाळकर यांनी संशोधन प्रक्रिया व त्यासंबंधी उपलब्ध करावयाची संसाधने या विषयी आपले विचार मांडले. ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, स्टडी मटेरियल यातून नवीन माहिती घ्यायची असते. आजच्या विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाची नवतंत्रप्रणाली येत असल्याने शिक्षकाने सतर्क राहणे गरजेचे आहे, असे विचार व्यक्त केले. तिसऱ्या सत्रामध्ये एम. यु. कॉलेज, पुणे येथील माजी प्राचार्य डॉ. शिरीष चिंधडे यांनी नवशिक्षणातील बदलते तंत्रज्ञान यावर मौलिक विचार मांडले. आजच्या शाळा, महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी व त्यांच्यात मुल्यशिक्षण जतन करणेसाठी शिक्षकाची भूमिका जोखमीची आहे. कर्तव्य भावनेने काम करण्याने आजची शिक्षणव्यवस्था सक्षम बनेल, असे विचार मांडले. या चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयातील संशोधक, प्राध्यापक, निबंधवाचक उपस्थित होते.

# देशप्रेमाचे ध्येय उराशी बाळगून वाटचाल करा

कोल्हापूर दि.२२ : एन. सी. सी. छात्रांनी शिस्तप्रिय व कर्तव्यनिष्ठ असले पाहिजे. एन. सी. सी. च्या माध्यमातून छात्रांना अनेक साहसी शिबिरात सहभागी होण्याची संधी प्राप्त होत असते. त्यातून अनेक अनुभव येतात. विविध भागातील संस्कृतीचे दर्शन त्यांना घडते तसेच सामाजिक बांधिलकीची जाणीव होते. यातूनच देशप्रेमी अष्टपैलू एन. सी. सी. छात्र घडतो. असे विचार विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. ते विवेकानंद कॉलेजच्या एन. सी. सी. विभागाच्या वतीने आयोजित पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील होते.

याप्रसंगी वेगवेगळया राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय एन. सी. सी. कॅम्पमध्ये सहभागी झालेल्या व विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या २९ छात्रांचा मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. देवयानी जोशी हिचा २६ जानेवारी, २०१९ रोजी दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनी संचालनात सहभागी झालेबद्दल विशेष सत्कार करणेत आला. सुप्रिया संकपाळ हिने एन. सी. सी. च्या प्रगतीचा आढावा स्लाईड शो व्दारे घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन सुनीता भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन पियुष कुपटे व तृप्ती कुंभार यांनी केले. आभार कु. निकीता पाटील यांनी मानले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

कोल्हापूर दि.१६ : शिक्षणाबरोबरच विविध कला, क्रीडा, साहित्य लेखन व सांस्कृतिक उपक्रमात सहभाग घेऊन यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढत असतो. विवेकानंदने ही यशाची परंपरा अखंड राखून विद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. कला, क्रीडा व साहित्यावर प्रेम असणाऱ्या विद्यार्थ्यांनी जीवनाची शिडी चढून जाण्यासाठी अपार कष्ट व परिश्रमातून आपले ध्येय साध्य केले पाहिजे, असे विचार विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी बोलताना व्यक्त केले.

याप्रसंगी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळात यश प्राप्त खेळाडू, सांस्कृतिक उपक्रमात सहभागी झालेले कलाकार विद्यार्थी, वक्तृत्व, वादविवाद स्पर्धेत व साहित्यलेखन करणारे विद्यार्थी तसेच एन. सी. सी. व एन. एस. एस. मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॅकसूट व गौरव चिन्ह देऊन सत्कार करणेत आला. तसेच जिमखाना विभागातील कामकाजासाठी बहुमोल सहकार्य करणारे सेवक श्री. सुरेश चरापले यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. आरिफ महात, प्रा. बी. एस. नागनूर, प्रा. बी. एस. लाड, प्रा. श्रीमती शहिदा कच्छी, डॉ. नीता पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी विवेकानंद, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने, संस्था प्रार्थनेने व रोपास पाणी घालून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. संतोष कुंडले यानी केले. आभार एन. एस. एस. प्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी मानले. या वेळी प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# 'विद्यार्थी परिषद निवडणूक' कार्यशाळा संपन्न

कोल्हापूर, दि. ५ : चालू शैक्षणिक वर्षापासून विदयापीठ कायदयानुसार महाविद्यालयामध्ये विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका होत आहेत. यासाठी महाविद्यालयातील सर्व घटकांना त्याला सामोरे जायचे आहे. या निवडणूका शांततेत व सुरळित पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी संघटीतपणे निवडणूक प्रक्रियेचे कामकाज केले पाहिजे. निवडणूक कायद्याचे काटेकोर पालन केल्याने या निवडणूका यशस्वी करता येतील, असे विचार विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थी परिषद निवडणूका या विषयावरील कोल्हापूर जिल्हास्तरीय कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर व इतर मान्यवर.

या कार्यशाळेच्या पहिल्या तांत्रिक सत्रात श्री. पी. जी. कुंभार (सदस्य, विद्यार्थी परिषद निवडणूक व्यवस्थापन समिती) यांनी Regulatory Framework of Election या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात श्री. अमित कुलकर्णी, (अध्यक्ष तथा व्यवस्थापक परिषद सदस्य) Procedural aspects of Election या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले, निवडणूक आयोगाची आचारसंहिता, निवडणूक प्रक्रिया, विद्यापीठ निवडणूक कायद्याची माहिती, कागदपत्रांची माहिती व पात्रता उमेदवारापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

प्रास्ताविक व स्वागत प्रा.डॉ. डी. बी. पाटील यांनी केले. आभार प्रा. सी. जे. कांबळे यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे व प्रा. सौ. एस. आय. इनामदार यांनी केले.

# डॉ. आंबेडकर जयंती साजरी

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेज मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२८ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राज्यशास्त्र विभागातील प्रा. कु. समिक्षा फराकटे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याबद्दल मुलभूत विचार मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन लिहिलेली भारतीय राज्यघटना ही सर्वोच्च अशी राज्यघटना आहे, असे विचार मांडले. आभार प्रमुख प्रा. किरण पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी, विद्यार्थिनी, एन सी सी छात्र उपस्थित होते.

